# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**

माय पुणे जिल्हा उत्तर ५ पुढारी पुणे, शुक्रवार २ फेब्रुवारी २०१८

### सोशल मीडिया गंधर्व, राक्षसही : प्रवीण तरडे

राजगुरुनगर : प्रतिनिधी

आजची तरुण पिढी सोशल मीडिया नावाच्या आभासी जगात गुरफटून गेली आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या नकारात्मक प्रभावामुळे ते मानसिकतेच्या दुबळे बनत चालले आहेत. युवकांनी आपल्या प्रगतीसाठी वापर केला तर सोशल मीडिया गंधर्व ठरेल नाही तर ते राक्षस ठरू शकते, असे प्रतिपादन नाट्य-चित्रपट अभिनेते, पटकथा लेखक, दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. यात 'सोशल मीडिया आणि तरुणाई' या विषयावर तरडे बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, डॉ. रोहिणी राक्षे, उमेश आगरकर, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, नियती राजाभाऊ पायगुडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

संवादाचा संस्कार हा सहवासातून होतो. त्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद ठेवण्यापेक्षा प्रत्यक्ष वेळ द्या. माणूस जगणे ही एक कला असून आयुष्यात येणारा एक एक माणूस जपा, असे आवाहन तरडे यांनी यावेळी केले. डॉ. राजेंद्र शिरसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. शिल्पा टाकळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. जी. कुलकर्णी यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. २ फेब्रुवारी २०१८ ४

प्रवीण तरडे : राजगुरुनगरला साहेबराव बुट्टेपाटील व्याख्यानमाला

### चांगलेपणाशी मैत्री करा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : आजची तरुण पिढी सोशल मीडिया नावाच्या आभासी जगात गुरफटून गेली असून त्यातून निर्माण होणाऱ्या नकारात्मक प्रभावामुळे ते मानसिकदृष्ट्या दुबळे बनत चालले आहेत. युवकांनी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने सोशल मीडियाचा वापर आपल्या प्रगतीसाठी करताना त्यातील चांगलेपणाशी म्हणजेच गंधर्वाशी दोस्ती करा आणि वाईट प्रवृत्तीच्या राक्षसापासून लांब राहा, असे आवाहन नाट्यचित्रपट अभिनेते, पटकथालेखक, दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सोशल मीडिया आणि तरुणाई' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर संचालक शांताराम घुमटकर, डॉ. रोहिणी राक्षे, उमेश आगरकर, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, नियती राजाभाऊ पायगुडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपले आयुष्य बदलण्यासाठी एखादा विचार, घटना अथवा एखादे पुस्तक पुरेसे असून त्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहता आले पाहिजे, असे ते म्हणाले. माणूस जपणे ही एक कला असून एक माणूस एकदाच असतो त्याला जपा, असे आवाहन त्यांनी केले.

समृद्ध होण्याची कला ही संवादातून साधली जाते. संवादाचा संस्कार हा सहवासातून होतो.

त्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद ठेवण्यापेक्षा प्रत्यक्ष वेळ द्या.

कष्ट करा. महाविद्यालयीन जीवन कसे जगतात यावरून तुमचे भविष्य ठरणार असल्याने अभ्यास करा. सज्जन होण्याचा प्रयत्न करा.

आपल्याला पाहिजे तेवढेच घेता येणे हा समृद्धीकडे नेणारा प्रवास असून जगाच्या विस्तारण्याच्या क्षितिजाचा फायदा करून घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



> सोशल मीडिया हे सीताफळासारखे आहे. मात्र त्यातले काय खायचे काय फेकायचे, याचा सारासार विवेक जपता आला पाहिजे. सोशल मीडियाचा तारतम्याने वापर अभ्यासासाठी, शिक्षणासाठी अधिक होणे गरजेचे आहे. वास्तवात सोशल मीडिया हे अफवा व खोटी माहिती पसरविण्याचे एक मोठे माध्यम ठरू पाहत आहे. कोरेगाव भीमा येथे काही दिवसांपूर्वी झालेला जातीय तणाव हे त्याचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगून दोनशे वर्षांपूर्वीच्या इतिहासातील एखाद्या तत्कालीन संदर्भ उकरून काढून जातीय दंगल पसरविणे हे देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने घातक आहे. यात सामान्य लोकच भरडले जातात. त्यामुळे लोकांनी सोशल मीडियातून निर्माण होणारी संकुचितता, नकारात्मकतेपासून सावध राहायला हवे. कोणताही संदेश पूर्ण वाचल्याशिवाय व त्याच्या परिणामांचा विचार केल्याशिवाय दुसऱ्याला पाठवू नका.
>
> – प्रवीण तरडे

**केसरी** पुणे, २ फेब्रुवारी २०१८ ३

# सोशल मीडिया हा गंधर्व आणि राक्षसही : प्रवीण तरडे



साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना अभिनेते प्रविण तरडे.

राजगुरुनगर, (वार्ताहर) : आजची तरुण पिढी सोशल मीडिया नावाच्या आभासी जगात गुरफटून गेली असून त्यातून निर्माण होणाऱ्या नकारात्मक प्रभावामुळे ते मानसिकदृष्ट्या दुबळे बनत चालले आहेत. युवकांनी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने सोशल मीडियाचा वापर आपल्या प्रगतीसाठी करताना त्यातील चांगलेपणाशी म्हणजेच गंधर्वाशी मैत्री करा आणि वाईट प्रवृत्तीच्या राक्षसापासून लांब रहा, असे आवाहन प्रसिद्ध नाट्य चित्रपट अभिनेते, पटकथालेखक, दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सोशल मीडिया आणि तरुणाई' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, डॉ. रोहिणी राक्षे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, निर्मिती राजाभाऊ पायगुडे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रवीण तरडे म्हणाले, सोशल मीडिया हे सीताफळासारखे आहे. त्यातले काय खायचे आणि काय फेकायचे याचा सारासार विवेक जपता आला पाहिजे. सोशल मीडिया हाताळताना तिचा वापर अभ्यासासाठी, शिक्षणासाठी अधिक होणे गरजेचे आहे. वास्तवात सोशल मीडिया हे अफवा व खोटी माहिती पसरविण्याचे एक मोठे माध्यम ठरत आहे. भीमा कोरेगाव येथे काही दिवसांपूर्वी झालेला जातीय तणाव हे त्याचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगून २०० वर्षांपूर्वीच्या इतिहासातील एखादा तत्कालीन संदर्भ उकरून काढून जातीय दंगल पसरविणे हे देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने घातक आहे. यात सामान्य लोकच भरडली जातात. त्यामुळे लोकांनी सोशल मीडियातून निर्माण होणारी संकुचितता, नकारात्मकतेपासून सावध राहायला हवे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. राजेंद्र शिरसे यांनी करून दिला. तर आभार प्रा. ए. जी. कुलकर्णी यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख